# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 10.10.2026** **वार : शनिवार**

1. किशोरवयीन मुलींचं आरोग्य, पोषण आणि सर्वांगीण विकास यांवर अधिक लक्ष केंद्रित करण्याचं पंतप्रधानांचं आवाहन
2. सीजेपीच्या नवी दिल्लीतल्या आजच्या प्रस्तावित आंदोलनाला परवानगी द्यायला दिल्ली पोलिसांचा नकार
3. एसआयआरबाबत विरोधी पक्षांच्या शिष्टमंडळानं घेतली राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट
4. भारत कोणत्याही क्षेत्रात मक्तेदारीला परवानगी देत नाही-दूरसंवाद मंत्र्यांचं स्पष्टीकरण आणि
5. वीस षटकांच्या दुसऱ्या क्रिकेट सामन्यात वेस्ट इंडीजचा भारतावर सहा गडी राखून विजय

**पंतप्रधान-महिला-बालविकास**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी किशोरवयीन मुलींचं आरोग्य, पोषण आणि सर्वांगीण विकास यांवर अधिक लक्ष केंद्रित करण्याचं आवाहन केलं आहे. नवी दिल्ली इथं महिला आणि बालविकास विषयावरील दोन दिवसांच्या राष्ट्रीय विभागीय परिषदेच्या समारोप सत्रात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. लोकसहभागाच्या महत्त्वावर भर देत, अंगणवाडी केंद्रांचा विकास 'सामूहिक सहभागाची केंद्रे' म्हणून करावा, असं आवाहन त्यांनी केलं.

महिलांच्या सुरक्षेशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा करताना, महिलांची सुरक्षा, प्रतिष्ठा आणि सक्षमीकरण या विषयांवर मुलांसाठी वयानुसार योग्य असे अभ्यासक्रम किंवा माहितीपर सत्रे सत्रं विकसित करण्याचा सल्ला त्यांनी दिला. तसंच, विविध विभागांच्या समन्वित प्रयत्नांतून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या महत्त्वावरही त्यांनी भर दिला. या परिषदेत विविध राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधील मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी एकत्र आले होते.

**अदिती तटकरे**

'प्रत्येक बालकाला कुटुंबाचा अधिकार आहे' या तत्वावर बाल संरक्षण व्यवस्था बळकट करण्याला राज्य शासन प्राधान्य देत आहे असं महाराष्ट्राच्या महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी काल या परिषदेत सांगितलं. यावेळी अदिती तटकरे यांनी राज्यातल्या प्रभावी उपक्रमांचं सादरीकरण केलं.

**पंतप्रधान कौशल्य स्पर्धा**

युवा पिढीनं आपली कौशल्यं सातत्यानं अद्ययावत करण्याची आणि वेगानं बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याची गरज आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. चीनमध्ये शांघाय इथं होणाऱ्या जागतिक कौशल्य स्पर्धेसाठी निवड झालेल्या भारतीय चमूमधील युवकांशी काल पंतप्रधानांनी संवाद साधला. आंतरराष्ट्रीय बाजाराला अनुसरुन आपली कौशल्यं विकसित करण्याचं आवाहन करुन या पथकानं कौशल्य विकासाचे दूत बनावं असं पंतप्रधान यावेळी म्हणाले.

**दिल्ली निदर्शनं**

सीजेपीच्या नवी दिल्लीतल्या आजच्या प्रस्तावित आंदोलनाला परवानगी द्यायला दिल्ली पोलिसांनी नकार दिला आहे. याआधीच्या आंदोलनादरम्यान पक्षानं सार्वजनिक सुरक्षा नियमांचं आणि पोलिसांच्या मार्गदर्शक सूचनांचं उल्लंघन केल्यामुळे आंदोलनाची परवानगी नाकारत असल्याचं दिल्ली पोलिस सहआयुक्त नुपूर प्रसाद यांनी काल माध्यम प्रतिनिधींना सांगितलं.

सध्या जंतरमंतर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम 163 नुसार प्रतिबंध लागू करण्यात आले आहेत असं सांगून कायद्याचं उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल असा इशारा त्यांनी दिला.

दरम्यान, नवी दिल्लीत सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. दिल्ली मेट्रोनं आज संध्याकाळी 6 वाजेपर्यंत 45 मेट्रो स्थानकं प्रवेशासाठी किंवा बाहेर पडण्यासाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. दिल्ली वाहतूक पोलिसांनीही विविध ठिकाणी वाहतुकीचे मार्ग बदलले आहेत. लोकांनी विनाकारण प्रवास करू नये आणि प्रवास करायचा असल्यास पूर्वनियोजन करावं असं आवाहन पोलिसांनी केलं आहे.

**<u>राष्ट्रपती विरोधीपक्ष नेते</u>**

विरोधी पक्षांच्या शिष्टमंडळानं काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. राष्ट्रपतींना निवडणूक आयोगाच्या विशेष व्यापक पुनरीक्षण अभियानातील कथित त्रुटींची माहिती दिल्याचं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी माध्यमांना सांगितलं. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांऐवजी पुन्हा मतपत्रिकेवर मतदान घ्यावं अशी मागणी राष्ट्रपतींकडे केली असून त्यांनी यासंदर्भातले पुरावे सादर करायला सांगितलं आहे. आम्ही हे पुरावे सादर करू असं खरगे म्हणाले. या शिष्टमंडळात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, तृणमूल काँग्रेस अध्यक्ष ममता बॅनर्जी आणि अन्य नेत्यांचा समावेश होता.

**<u>ज्योतिरादित्य सिंधिया</u>**

भारत कोणत्याही क्षेत्रात मक्तेदारीला परवानगी देत नसल्याचं केंद्रीय दूरसंवाद मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी म्हटलं आहे. भारतात कामकाज करण्यासाठी 'स्टारलिंक'ला परवाना देण्याबाबतच्या काँग्रेसच्या भूमिकेवरही त्यांनी टीका केली. नवी दिल्ली इथं काल झालेल्या 10 व्या 'इंडिया मोबाइल काँग्रेस'मध्ये ते बोलत होते. स्टारलिंक, जिओ सॅटेलाइट कम्युनिकेशन्स आणि युटेलसॅट वनवेब या तीन कंपन्यांनी उपग्रह-आधारित संपर्क सेवेचे परवाने मिळवले असल्याचं सिंधिया यांनी सांगितलं. या संदर्भातील कार्यपद्धती निश्चित झाल्यावर सरकार महसूल-वाटपाच्या तत्त्वावर या कंपन्यांना स्पेक्ट्रमचं वाटप करेल, असं त्यांनी स्पष्ट केलं. उपग्रह-आधारित संपर्क सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांना, विहित सुरक्षा निकष आणि इतर नियामक आवश्यकतांची स्वतंत्रपणे पूर्तता केल्यानंतरच सेवा सुरू करण्याची परवानगी दिली जाईल, यावर त्यांनी भर दिला.

**<u>राजनाथ-राष्ट्रीय सुरक्षा</u>**

सध्याच्या काळात राष्ट्रीय सुरक्षेची व्याख्या बदलली असून राष्ट्रीय सुरक्षा केवळ सशस्त्र दलांच्या ताकदीवरच नाही, तर संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेवरही अवलंबून असते, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते काल नवी दिल्ली इथं 'सोसायटी ऑफ इंडियन डिफेन्स मॅन्युफॅक्चरर्स'च्या 'चॅम्पियन्स अवॉर्ड्स' समारंभात बोलत होते. 2025-26 या आर्थिक वर्षात भारताची संरक्षण क्षेत्रातील निर्यात विक्रमी 38 हजार 424 कोटी रुपयांवर पोहोचली असल्याचं सिंग यांनी सांगितलं.

**<u>पोटनिवडणूक</u>**

पश्चिम बंगाल आणि आसाममधल्या पोटनिवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षानं विजय मिळवला तर तमिळनाडूमधल्या दोन जागांवरच्या पोटनिवडणुकीत तमिळ वेत्री कळघम पक्षानं विजय मिळवला. पुदुचेरीत थट्टनचावडीची जागा एआयएनआरसी पक्षानं आपल्याकडे राखली. दरम्यान, आसाम आणि पश्चिम बंगालमधल्या पोटनिवडणुकीतल्या विजयामुळे जनतेच्या मनातला भाजपाप्रणित एनडीए आघाडीवरचा विश्वास पुन्हा अधोरेखित झाला असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. समाज माध्यमावरील संदेशात पंतप्रधानांनी विजयी उमेदवारांचं अभिनंदन केलं आहे.

**<u>विधानपरिषद निवडणूक</u>**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघासाठीच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागं घेण्याचा काल शेवटचा दिवस होता. त्यामुळे आता पाचही मतदारसंघातलं निवडणुकीचं चित्र स्पष्ट झालं आहे. पुणे पदवीधर मतदारसंघासाठी भाजपाच्या स्मिता जाधव आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या हर्षदा देशमुख- जाधव यांच्यात लढत होणार आहे. पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपाचे कौस्तुभ गावडे आणि काँग्रेसचे जयंत आसगांवकर निवडणूक लढवत आहेत.

नागपूर पदवीधर मतदारसंघात भाजपाचे बंडखोर उमेदवार रमण सेनाड यांनी भाजपाचे अधिकृत उमेदवार सुधाकर कोहळे यांना पाठिंबा जाहीर केला. अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी 26 उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. काल चार उमेदवारांनी माघार घेतली. औरंगाबाद पदवीधर मतदारसंघातून 13 जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले.

**निवडणूक आयोग**

मतदारांनी वैयक्तिकरित्या अर्ज 7 दाखल करण्यावर निवडणूक आयोगानं मर्यादा घातली आहे. दावे आणि हरकतींच्या काळात जास्तीत जास्त 10 वेळा आणि मतदार याद्यांच्या अद्ययावतीकरणाच्या काळात महिन्यातून पाच वेळा अर्ज करण्याची परवानगी आयोगानं दिली आहे. मतदारांनी वैयक्तिकरित्या मोठ्या प्रमाणात हरकती नोंदवण्याला आळा घालण्यासाठी ऑनलाईन आणि प्रत्यक्षात अर्ज सादर करण्यावर ही मर्यादा घातली आहे. या हरकती खोट्या असल्याचं किंवा हेतूपुरस्सर दाखल केल्याचं आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असं आयोगानं स्पष्ट केलं आहे.

**फ्लाय दुबई तपास**

फ्लायदुबई विमानाच्या सहवैमानिकावर हल्ला करणाऱ्या ओमानच्या सहवैमानिकाला दहशतवादी हल्ल्यासाठी आधीच तयार केलं होतं, असं या यूएईच्या तपास पथकानं काल स्पष्ट केलं. या संशयित आरोपीनं विमानाचं नियंत्रण बंद पाडण्याची योजना आखली होती आणि हे विमान तेल अवीव इथल्या विमानतळावर आत्मघाती हल्ला करण्यासाठी वापरण्याचा त्याचा हेतू होता असं युएईच्या महाधिवक्त्यांनी म्हटलं आहे. तेल अवीवचं विमानतळ आणि हवाई मार्गाची माहिती करुन घेण्यासाठी हा वैमानिक आधी दोन वेळा तिथं सहवैमानिक म्हणून गेला होता असंही तपासात आढळून आलं आहे.

**अमेरिका-रशिया-डिझेल**

अमेरिकेनं रशियाच्या डिझेलच्या विक्रीवरील निर्बंध काल उठवले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी चर्चा करून अमेरिकी आणि जागतिक बाजारपेठेला डिझेल पुरवठा करण्याचा करार केल्यानंतर काही मिनिटांतच अमेरिकेच्या कोषागार विभागानं ही घोषणा केली.

**क्रिकेट**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातल्या दुसऱ्या टी-20 क्रिकेट सामन्यात काल वेस्ट इंडिज संघानं भारताचा सहा गडी राखून पराभव केला. यामुळे पाच सामन्यांच्या मालिकेत 1-1 अशी बरोबरी झाली आहे. 250 धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजनं 18 षटकं आणि 3 चेंडूत 4 गडी गमावून 252 धावा करत सामना जिंकला. कर्णधार शाई होपनं 45 चेंडूत 102 धावांची खेळी करत 'सामनावीर' पुरस्कार पटकावला, तर शेरफेन रदरफोर्डनं 37 चेंडूत 84 धावा करत विजयात मोलाचं योगदान दिलं. तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना भारतानं निर्धारित 20 षटकांत 5 गडी गमावून 249 अशी धावसंख्या उभारली. भारतातर्फे संजू सॅमसननं 41 चेंडूत 82 धावांची खेळी करत सर्वाधिक धावा केल्या; तर, इशान किशननं 22 चेंडूत 43 केल्या.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.